म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. १.
सन १९२३

# गाढ-शाहीर.

REFBK-0002324
REFBK-0002324

कवि

श्रीयुत:—अनाथपांडुरंग.

कि. २ आणे.

# प्रस्तावना कशाला ?

३८४

सूर्याचें तेज दाखविण्याला दिवा कशाला ? हृदयांत पेटलेली देशाभिमानाची ज्योत दाखविण्याला शिफारसपत्रें कशाला ? आणि स्वातंत्र्याचे पोवाडे गाणाऱ्या कवीच्या स्फूर्तिदायक काव्याला प्रस्तावना तरी कशाला ?

सोनचाफ्याचें फूल, संतहृदयांतरींचें पावित्र्य आणि स्वतंत्रता देवीचा पोवाडा या तीन गोष्टींनीं जो मोहून जाणार नाहीं तो कसला माणूस ! माणूस तो कीं ज्याच्या हृदयाला कोमल विकारांचा स्पर्श होतांच प्रेमानें उचंबळून जातो, पावित्र्याचा स्पर्श होतांच रोमांचित होतो आणि स्वातंत्र्याचा मेघनाद कानावर आदळतांच ताडदिशीं खडा होतो !

राष्ट्रशाहीर हें काव्य म्हणजे स्वातंत्र्याचा मेघनाद आहे. हा मेघनाद तरुणांच्या कानावर जाऊन आदळेल तर ते भिरभिरणाऱ्या नेत्रांनीं सैरावैरा पाहूं लागतील, थरारून गेलेल्या भावनांनीं बेभान होतील आणि पराक्रमाच्या तेजस्वितेनें चकाकतील !

असें हें तेजस्वी, पाणीदार आणि थरारून सोडणारें काव्य आहे. रसिकांनों, हें काव्य वाचा आणि राष्ट्रप्रेमानंदांत डुलत रहा ! हे कविवर्या, तूंहि अशींच स्फूर्तिदायक गीतें गाऊन आमच्या गारठलेल्या वृत्तींना उत्तेजित कर. कारण, स्वातंत्र्याचें काव्य ऐकून "**मेलेलीं हृदयेंही मग कां जागीं न होतील** ?

म्हणून म्हणतों, कवीनें गावें आणि रसिकांनीं गान ऐकावें हाच साधा सरळ आणि स्पष्ट मार्ग. या मार्गाला आड येणारी आणखी आमची प्रस्तावनेची धोंड मध्येंच कशाला ?

मुंबई.
ता. १८।६।२३

**अनंत हरी गद्रे.**

# हृदय-वीणा.

शिवकालीन परिस्थितीचें भडक चित्र हृदयाचे चंचल चित्रपटावर स्मृतीच्या कुंचलीनें रंगवूं लागलें, तर छत्रपतींच्या झोळींत पडलेल्या लोकसंग्रहाच्या फकीरीकडेच प्रथम लक्ष जातें; व बदलत्या काळा बरोबर उसळत्या रक्ताची लाट कशी ओसरत गेली याचें सखेद आश्चर्य वाटतें स्वराज्याच्या वृक्षाला उच्च-नीच हा भेद न ठेवतां, ज्यांनीं निधड्या-छातीनें आपल्या देहाची झारी करून पुरा बहर आणला; त्या नररत्नांच्या केवळ आठवणीनें मनाला उद्वेग वाटतो व 'गेली घडी पुन्हां परतेल कां'? अशा विचारानें स्वातंत्र्येच्छू जिवाला परिस्थितीच्या रानावनांत स्वैरपणें भटकावें लागतें.

प्रस्तुत काव्यांत सर्व साधारण परिस्थितीचा विचार केला असून पूर्वजांच्या पराक्रमाची त्यांस जोड दिली आहे. एकाच भू-मातेच्या पोटीं जन्मास आलेलीं-मग तो ब्राम्हण असो अगर महार असो-देवा घरीं एका रंगारूपानें, फार काय पण एकाच अंतःकरणानें अवतार घेतलेलीं बालकें भू-तलावरही सारख्याच योग्यतेची समजलीं पाहिजेत.

आयुष्याच्या डोंगराळ प्रदेशांत अनेक आपत्तींच्या दगडा-धोंड्याशीं टक्कर देतां-देतां बालवयांतच हताश व वनवासी बनलेल्या जागत्या जिवाच्या डोळ्यांत ज्यांच्या सहानुभूतीच्या व धीराच्या गोड सहवासानें आनंदाचे अश्रू क्षणभर तरी चमकलें; ज्यानीं मला काव्य लिहिण्याच्या कामीं वेळोवेळीं सूचना करून, माझ्या या राकट जाइजुईच्या ताटव्याला महाराष्ट्रशारदेच्या नयनरम्य वाटीकेंत नित्यशः बेहोषपणें गुंगणाऱ्या रसिक भुंग्याच्या निदर्शनास आणून देणेचा प्रयत्न केला; ते माझें प्रेमळ मित्र रा. रा. शां. ल. संसारे यांचे आभार कोणत्या शब्दांत मानूं हेंच मला सुचत नाहीं.

शेवटीं माझें मित्र रा. रा. अनंत हरी गद्रे. सं. मौज. यांनीं माझ्या विनंतीला मान देवून प्रस्तुत काव्यास आपल्या छोटेखानी प्रस्तावनेचा पोशाख चढविल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानून या गोजिरवाण्या **राष्ट्रशाहीराची** बहरलेलीं रानफुलें मी वाचकांचे हवालीं करतों.

गिरगांव मुंबई, ता. १६-६-२३.
शके १८४५.

**अनाथपांडुरंग.**

॥ जय भवानी ॥

# राष्ट्र-शाहीर.

REFBK-0002324

[ १ ]

REFBK-0002324

वंदन आधीं मायभवानी स्वतंत्रतादेवी
तुझा वरदकर शिरीं सुखाचा शुभास्पदे! ठेवी.
ऊठ शाहिरा! स्वातंत्र्याचा पोवाडा गाऊं
भारतभूच्या पदकमलीं या जीवफुला वाहू.
ऊठ किशोरा! ऊठ लाडक्या! ऊठ-ऊठ आतां
स्वातंत्र्याची उषा हांसली - हर्ष होय जगता.
दख्खनच्या वीरांचा नटला - भरला दरबार
शिवशाहीच्या चढत्या दौलतिचें हें माहेर.
तेहतिस कोटी देव निघाले सभेस यायाला
स्वतंत्रतेचा जरिपटका जणुं भिडला गगनाला.
तारागण हा गुलाब फुलला स्वतंत्र-सुखधामीं
प्रसाद-किरणें पावन झाली महाराष्ट्र-भूमी.
महाराष्ट्राच्या कांलिजा प्यारा! असह्य असहाया
श्री शिवराया विनती पायां या हो या समया.
जनहृदयाच्या मगंलमूर्ते श्री टिळका राया!
दीनांचा हंबरडा ऐकुनि धांवुनि या साह्या.

राष्ट्रामाजीं आजि गुजरला दुःखाचा कहर
अपमानाच्या भालेबरच्या नाचती चौफेर.
सत्तेच्या धुंदींत गुंगला असे दंडधारी
अन्यायाचा प्रलय माजला नरेंद्रदरबारी.
नका-नका बलवंता आतां अंत नका पाहूं
दास्य-तमीं भू-गाय बुडाली किती किती विनवूं ?
खरेंच; तुमचा बन्धु सखा तो कुठें तरी रमला ?
जनतेचा आत्माच 'महात्मा' जिजीवासाला.
लोकशाहिचा वीर-केसरी नरपुंगव थोर
कैसा सांपडला खलहातीं रत्नालंकार ?
ऊठ शाहिरा ! ऊठ चढवि तूं नवतीची तार.
दख्खनच्या वीरांचा नटला-भरला दरबार

[ २ ]

ऊठ शाहिरा, पंचीप्यारा ! गारे गा गीत
स्फूर्तीचे तव बोल खेळवी अमुच्या हृदयांत.
स्वतंत्रतेची सतार वाजवुनी घे तानेला
मार डफावरी थाप डोलवी जनपद-हृदयाला.
स्वतंत्रतेच्या मधुकमलीं बेहोष गुंगणाऱ्या !
जाइजुईच्या सुंदर क्रीडांगणिं वागडणाऱ्या !
स्वातंत्र्याच्या अफाट गगनीं झेंप घालणाऱ्या !
फुलत्या आकाशाच्या लालीसवें हांसणाऱ्या !
शिवशाहीच्या गरुडा !—माझ्या जिविच्या जीव-फुला
जनहृदयाच्या भृंगवरा -तूं-विहंग गिरिबाला !
सरस्वतीचा भक्त मनोहर रणांत रणधीरा !

महाराष्ट्र-लक्ष्मीच्या रसवंतीच्या सरदारा !
गोड तुझ्या त्या रसवंतीची प्रतिभा चमकूं दे.
छत्रपतीच्या यशोगायनीं विलीन होऊं दे.
रायगडावरि बिजली चमकली स्वतंत्र तलवार
पूर्वज-विक्रम-क्षात्रतेज-किरणांची जरतार.
तिच्या पुण्य-पद्कमलांचें दे मज पावन-तीर्थ
निज प्राणांचीं फुलें उधळुनी जन्म करूं सार्थ
शिवसौख्याचा उरलासुरला सोहाळा गाई
सांथ कराया धांवत आली बघ कृष्णामाई.
आठवुनी गत-वैभव कां रे रडते ही बाला !
आत्मसमर्पण करण्या सजली कां शिवचरणाला !
अश्रू टपटपां-ताराकुसुमें उधळी भवंताली
मौक्तिक-माला कुणा देविच्या कण्ठांतिल तुटली. !
तुझ्या ललाटीं भव्य यशाची मंगलमय तीट
तुझ्या गायनीं उठवी शिवनेरी जुन्नर पेठ.
शब्दांची शृंगार शेज तुज साता नवसाची
गड्या, वाजवी कशी तुतारी दिगंत-कीर्तीची.
भारत-भूची यशो-दुंदुभी अशीच निजणार ?
गतकालाची कोण तुझ्याविण स्मृतीच देणार.

[ २ ]

देशासाठीं धर्मासाठीं बाहू फुरफुरले
वीर अघाडी कशास फुगडी रायगडीं खेळे.
स्वातंत्र्याचा वसंत हांसत थुइथुइ नाचतसे
शिवशाहीचा स्वार शिबंदी हृदया डुलवितसे.

मायभूमिच्या अब्रूसांठीं जिवास जोहार
रणतेजाची अभिमानाची दौलत त्यां प्यार.
राष्ट्र-संगरीं सहज तळपतां भवानि समशेर.
मृत्यूनेंही लपुनि वसावें खिंडित चौफेर.
रायगडावरि स्वाराज्याचा रुजला द्रुमराज
सांग गड्या ! कां कर्तृत्वाची वाटतसे लाज ?
संताजीच्या पुण्यबलानें सूर्याजी राया
निजरुधिरानें न्हाउं घालि कां शिवरायापायां ?
समरकर्दमीं तव यश गावुनि तानाजी बाळ
प्रसन्न हृदयें पांघरला कां मृत्यूची शाल ?
शेलाराच्या शौर्यत्वाचा भरला थैमान
कलम करी अरि-हस्ताला परि गोड तया मरण.
मायभूमिचा टाहो ऐकुनि थडग्यांतुनि उठले
चौमुलखीं कां नव्या दमाचें यशोगान दुमलें ?
सह्यागिरीच्या कडेकपारीं इमान वीरांचें
नाचतसें कां बोल किशोरा ! वैभव दख्खनचें ?
तुझे मुगुटमणि बुरुज गडांचे निर्जिव पाषाणीं
तुझ्या यशाची ताजिम देती जगांस दिनरजनी.
घोड खिंडिच्या शिवनेरीच्या फत्तरांत अझुनि
'स्वराज्य' ऐसें शब्द उमटती येति न कां कानीं.
राष्ट्राचें सौभाग्य उजळिलें कोणीं समरांत
अभिमानानें त्यांतें अजुनी जन हें कां गात !
देशभक्तिची ज्योत उजळली कुणि जन हृदयांत
वीर-हृदय रंगलें कशाला वद, रिपु-रक्तांत ?

किमर्थ घडलें या रत्नांचें जगतीं अवतार ?
गतकालाची कोण तुझ्याविण स्मृतीच देणार ?

[ ४ ]

सारिपाट मांडिला महाराष्ट्राच्या नशिबाचा
कोंडाण्यावर तारा तुटला शिव-ऐश्वर्याचा.
गेलि घडी कां अशी सुखाची पुनरपि परतेल ?
शाहीरांची ब्रम्हानंदीं टाळी लागेल ?
मेलेली हृदयेंही मग कां जागि न होतील ?
राष्ट्र-प्रेमाचें कारंजें कां नच उडतील ?
ऊठ शाहिरा, ऊठ चढवि तूं नवतीची तार
मोहमहार्णवि संप्रति बुडला महाराष्ट्र-वीर.
तुझ्या डफाची थाप कशी ती कानीं येईल ?
चित्त कसें तव रसवंतीच्या गानीं गुंगेल ?
आशेच्या झोल्यावरि बसुनी ताना घेशील
कसा आमुचा राजहंस हृदयींचा डोलेल ?
तुझ्या गायनीं सुख-सरिता जरि झुळझुळ वाहील
कमनशिब्याला तीर्थ तिचें तें कैसें लाधेल ?
दारिद्र्याची बिजली पडत्याकाळीं चमकेल
कर्तव्याची जाणिव मूढा तरि कां होईल ?
वेणुवनीं तव ऐक्याचा ध्वनि मंजुळ उमटेल
पाषाणाच्या मूर्ति कधीं कां सजीव बनतील ?
पहा शाहिरा ! अर्ध्या मिटल्या नयनीं भंवताली
महाराष्ट्र-लक्ष्मीच्या विभवा प्रेतकळा आली.
आर्यांचा तो हाय ! अलौकिक आर्यपणा गेला

जनहृदयांतरी कैसा रुतला पारतंत्र्य-भाला !
सत्वाचा भरला विक्रय दास्याच्या बाजारीं
करिं-भिक्षेची झोळी शिरिं ती नटवी सरदारीं
स्वजनावरतीं गाजवुं पाहे फुकाच अधिकार
परकीयांच्या मर्जीला परि कुर्निसात थोर.
बंधुत्वाचा खूनचि ठरला-सत्या ना थांग
देशभक्तिविण मरण जिवाला कां न बरें सांग ?
ऊठ शाहिरा ! डोळ्यावरची उडवी जडतार ?
गतकालाची कोण तुझ्याविण स्मृतीच देणार ?

[ ५ ]

स्वराज्य गेलें ! स्वधर्म गेला !! गेलें जनतेज !!!
पूर्वार्जित धनवैभव गेलें परदास्यीं शेज.
सहानुभूतिच्या आकाशीं मतभेद-मेघमाला
संप्रति अवघा मात्सर्याचा डोला सजलेला.
भक्ति-मार्गदिप मावळला मग तपाचरण कुठलें ?
लुंग्या सुंग्या देशभक्तिनें जग हें नटलेलें.
धर्मध्वज डळमळला अवचित राष्ट्रगिरी-वरुनी
कशी बघवते पायमल्लि त्याची तुज डोळ्यांनीं ?
परासक्ति नाचते कुणाच्या पापी हृदयांत
स्वार्थपरायण कुणी रंगला-कोणी कलहांत.
यादवकुळिचा तरुवर पडला ना या यादविनें ?
शिवशाहीचा स्वतंत्र-सुख-रवि गिळिला ना यानें ?
पेशवाइच्या तक्ताचीं शकलें केली यानें ?
रसातळाला किती घराणीं नेलीं ना यानें ?

कलहानल हा भारतियांचा केव्हां विझणार ?
बोल जीविच्या जीवा, देवा! माझ्या शाहीरा!
स्वामिकार्य सांप्रत तें कुठलें? वद सत्य सत्य
पूर्ववीरबल मुखांत नटलें संगर-पांडित्य.
भाग्यसूर्य हा अज्ञानाच्या गिरी-गव्हरांत
आयुष्याला मोल कशाला उरलें जगतांत?
स्वराज्य-किल्ला दुर्गमपथ जो दावितसे नीट
देशभक्त वेड्यापरि ठरला शाहीरा! ऊठ.
स्वदेश-धर्मद्रोही आम्ही केवळ भू-भार
तळमळणारें मातेचें परि भेदितसों ऊर.
बेइमान निजराष्ट्राशीं कां हिंद-पुत्र हाय!
याहुनि वंध्या कां न निपजली आमुची भू माय?
मतभेदाच्या दिवट्या उजळुनि उजेड दुनियेस
नांवहि मोठें परि करतों या उलट्या करणीस.
एकीचें बळ जगा दावया घेरे अवतार
गतकालाची कोण तुझ्याविण स्मृतीच देणार?

[ ६ ]

हाय! हाय!! पंजाबीं उठली अघोर ललकारी
त्राही भगवन् जनता केली अधमानीं भारी.
भू-देवीचा पदर ओढिला-सत्ता राजकरीं
सती द्रौपदी धर्म-सभेमधिं-दुःशासन वैरी.
कोसळत्या आकाशाची ही कुऱ्हाड पडणार?
किंवा भारत-नौकेचें हें शीडचि ढळणार?
अपमानाचा कडा गरीबांवरि कोसळणार?

वीरवरांचा लौकिक-तारा किंवा तुटणार ?
परसत्तेच्या लाटा मोठ्या उचंबळति स्वैर
जिकडे तिकडे अन्यायाची दंगल उडणार ?
आर्यावर्ती प्रलयकाल कां पुन्हां प्रकटणार ?
तृतीय नेत्रां उमारमण कां आज उघडणार ?
धांव, दयाळा धांव, तुझा आक्रोश ऐकीव
तेहतिस कोटी किंकाळ्यांची सजली भरधांव.
कधीं आमुची दया लाडक्या ! तुला उपजणार ?
दुष्टावा कोणत्या जन्मिचा काय साधणार ?
गोंडस बाळा, सदा झगडतां फुटलें तकदीर
किंवा देशोद्धारणि तूही डोळे मिटणार ?
पूजनीय निज मातेसम जी महाराष्ट्रियाला
गोमातेचा टाहो हरहर कां नच ऐकियाला ?
दुग्धाविण रोडलीं चिमुकलीं-वदनिं तेज कैचें ?
आकाशाची गमे पोकळी शरीर तरुणांचें.
नाना व्यसनें जडलीं तींतच जन हा बुडणार ?
गिळिला भारत-भूचा तन्मणि कसा परतणार ?
मदिरा-रत कुणि फणिवर जैसा गुंगित डुलणार
मायभगिनिंचीं अश्रु लुटाया कोणी सजणार !
ऐक-ऐक ही करुण कहाणी अनाथ अबलांची
विस्मृति कैशी पडली तुजला दिधल्या वचनांची ?
ऐशा रीतें कां अमुचा भाग्योदय होणार ?
गतकालाची कोण तुझ्याविण स्मृतीच देणार ?

[ ७ ]

तूंच एकला मनांस गमशी जगांत दिलदार
अस्पृश्यांचा प्रश्न तुजपुढें कैसें करणार ?
सद्धर्मी-रत शिवरायानें जमवुनि संघाला
एकजुटीनें एकमतानें स्वधर्म स्थापियला.
उच्च-नीच हा भेद-पसारा विसरुनिया पार
ऐक्य-ध्वजा कां कडकडली ती वद, अटकेपार ?
शरणागत निंबाळकराला कां दिधला हात ?
शिव-पदस्पर्शें पावन झाली कां मावळ जात ?
हा ब्राह्मण-हा अस्पृश्य असे-असे महारमांग
एकरूपता देहीं वसतां भेद कसा सांग ?
एक आइची गोजिरवाणी बाळें असतांनां
विष्णुपदीचें पवित्र दर्शन कां न घडे त्यांना ?
पंढरिच्या श्री पंढरिराया ! तूंहि कोपला कां ?
भाव-भक्तिची गोंडस लेंणीं दूर लोटली कां ?
चोखामेळा भक्त सांवळा त्याही विटला कां ?
नामा दगडी बाल संवगडी तोहि विसरला कां ?
भक्तिरसाचा पूर लोटला न कां वाळवंटीं
तव नामें रंगली नाहि कां ती कांबळकांठीं ?
असहायानां सहायता देण्यास महाभागा
घुटमळतें कां तव पायाशीं अजुनि चंद्रभागा ?
कितीक पतितां प्रसादकिरणें तुंवा तारियेलें
या बाळांनीं काय तुझें रे पाप असें केलें ?
शिक्षणाविना किती अधोगति घडली बघ यांची

दाखिव-दाखिव तत्परता त्या सूज्ञ करायाची
निजधर्मी कोठचा सुखाचा थारा त्यांस मिळे ?
निजबंधुगणीं अपमानाचा अहेर त्यांस मिळे.
आत्मा एकच सर्वांभूतीं जगांत फिरणार
सहन कसें हें दुबळ्या चित्ता तरीच होणार ?
परधर्मा मग प्रेमें ह्रुदयीं कां नच धरणार ?
असे यांत कां दोष तयांचा अनीतिचा पार ?
निजधर्माचा क्षय हा तुजला कैसा रुचणार ?
गतकालाची कोण तुझ्याविण स्मृतीच देणार ?

[ ८ ]

स्वस्थ कसें हो ! कोठें दडला अजुनी घननीळा ?
कोण अधम हा छळितो माझ्या भारत-मातेला ?
देश आमुचा-विपुल आमुची भाकरिही असतां
दारोदारीं आम्हीं फिरावें परि तुकड्याकरितां.
गोजिरवाण्यां बाळमुखांतिल काढुनियां घांस
परकीयांचें उदर भरावें आम्हीं राजरोस.
जमीनजुमला सर्व पळविला परी कायद्यानीं.
दुग्ध पाजितां उलटावें कां फिरुनी सापानी ?
दैवभोग संपे न पुरा कां अजुनी उपवास ?
कसा नशीबीं आला देवा, खडतर वनवास ?
नडे आमुची करणी आम्हां तुला काय दोष ?
कण्ठाभंवतीं परसेवेचा पडे-मृत्यु-पाश.

× × × ×

फॅशनचें हें वारें आलें हिंदीतरुणाला

परदेशीचा छंद लागला-मूढ किं हो बनला.
बुडवुनि स्वजनां परकीयां कां देतां वित्त-बली ?
लक्ष्मीची ही अशी करितसां कां उलटी होळी ?
कलाकुशलता पूर्वीच्या त्यां आज कुठें गेल्या ?
बाप गुणी परि पुत्र करंटा कैसा निपजेला ?
कोष्टीजन हा दीनपणानें मारितसे हांका
कांटे भरुनी पोटीं त्यांच्या चोज पुरवितां कां ?
समोर येतां मूल रांगतें लाथ मारितां कां ?
जातिलतेवर फूल हांसरें बघतां खुडितां कां ?
परकीयांच्या वैभवांत कां तुम्ही दंग झाला ?
पदतालिचा अंधार कुठे कां दिसतो नयनाला ?
सद्गुण-कुवलय-पूर्वजांकडे फेंक जरा डोळा
होतें कैसें तें परि आजी मान किती तुजला ?
गुलामगिरिच्या कारागारीं माता असतांनां
लाज कशी नच आनंदाचा दीप उजळतानां ?
परावलंबी जीवित सारें स्थिति ही यायाला
या परता मग सत्वाचा तव लय कोठें उरला ?

[ ९ ]

ऊठ शाहिरा ! निगाढता कां अशा काळवेळीं ?
झोंप काय ही तुला लागली बाळा ! शेवटली ?
महर्गतेचा पाउस धो धो झालें मन वेडे
मारामाऱ्या खून दरोडे परि जिकडे तिकडे.
हृदयाला लागतें कशाला शान्तीचें वारें ?
जीवन कलहीं सदा धडपडे मनुज दुःखभारें

ईशदयेचा जिवंत सागर सिंधु आटला कां ?
उजाड दाही दिशा भुकेल्या अविरत रडतीकां ?
दुष्काळाचा वणवा भडके घोर कारुणीक
अन्नान्न दशा जिवास मुकति पामर कित्येक !
बा काला ! तव जठरानल हा आज भडकला कां ?
सुगुणखनी तेजोमय रत्नें सांपडलि नक्कां ?
हार जननिचा कसा चोरिशीं माणिक-मोत्यांचा ?
हृदयविदारक दृश्यें फाटे दिल आकाशाचा.
कधीं उठविला बसल्या ताटावरच्या अतिथीला ?
म्हणुनी कवण्या साधूचा हा शाप काय नडला ?

\+ \+ \+ \+

दुःखाश्रूंची घेउनि हातीं ही मोहनमाळा
वाट बधूं किति सांग लाडक्या ! जीव किरे थकला ?
घनःश्याम सुंदरा कधीं-निजजनि मोहन बाळा
आत्मशुद्धिचा महामंत्र कां नाहीं तुज कळला ?
तुझ्याच सांठीं चंदनापरी झिजवितसें काया ?
तुझ्याच सांठीं फकीर बनला देशाचा राया ?
वहा ! शपथ घे-टाक तोडुनी पारतंत्र्य-पाश
दगडा धोंड्यांचा कणखर हा तुझा माय देश.
अंगावरि घे जाडयाभरड्या पवित्र खादीला
भुवन ललामीं तुझ्या फडकवी सत्व-निशाणाला.
सत्याचा मंगलमय तुझिया संगम कमनीय
उदारतेचा ठेवा, देवा ! 'मोहन' प्रभुराय.
भारतभूरमणी वैभव तें कधीं परतणार ?

गतकालाची कोण तुझ्याविण स्मृतीच देणार ?

[ १० ]

उठ शाहिरा ! सोड समाधी !! भवानि सुखकारी
ऊठ झडकरी वदीं द्याया देवा दरबारीं.
पुरे पुरे ही परवशता रे ! नको अंत पाहूं
किती आळवूं परोपरीनीं प्राण काय देवूं ?
जिजाइच्या तान्हुल्या, कधीं तूं जागा होशील ?
हंबरडा दीनाचा ऐकुनि कधीं धांवशील ?
दख्खनचें वैभव तुजभंवतीं केव्हां नाचेल ?
कीर्तिध्वजा तव रायगडीं कां पुनरपि फडकेल ?
तानाजीची यशवंती कधि इमान राखील ?
महाराष्ट्रावर पसरिल केव्हां हृदयाची झूल ?
सिंहगडाचे बुरुज यशाचें गीतहि गातील
स्वातंत्र्याचा राघु भरारी केव्हां घेईल ?
परशुधराचा कधीं चौघडा ऐकूं येईल.?
शाहिरांच्या मर्दपणाच्या ताना उठतील ?
सृष्टिसतीचा कोकिल सुंदर होनाजी बाळ
उषा हांसतां गोड भूपाळी कधीं आळवील ?
प्रभाकराची थाप डफावर केव्हां वाजेल ?
तुळशीरामा ! कधीं तुतारी तुझी वागडेल ?
जनावाइची नितान्त मधुरा वाणी रंगेल ?
श्री तुकयाचा अभंग-वीणा केव्हां गुंगेल ?
साधुचरित रघुनाथाचें डोळासुख घेईल
भक्तिरसाचा नुपुरध्वनी कधि मंजुळ उमटेल ?

मिराबाईच्या प्रभो गिरिधरा ! केव्हां उठशील ?
कधीं लक्ष्मीसम शौर्याची विजली झळकेल ?
चितोडगडच्या वीर—कुमारा ! केव्हां हंसशील ?
पानिपतावरि भाऊराया ! कधीं चमकशील ?
स्वामीसांठीं निजधर्माला केला जोहार
खंडोजी गुजरासम कुसुमें कधीं उमलणार ?
प्रल्हादासम ध्रुव—चिलयासम तुझा कर्मवीर
बापु गोखला वीर एकला कोठें दिसणार ?
शहरपुण्याची पुण्य अयोध्या केव्हां होईल ?
रामराज्य कधिं ऐश्वर्याचलिं सुखांत डोलेल ?
काजळकांड कधीं सुरगंगा प्रेमें भिजवील ?
कुठें विभव तव विमल यशान्वित मंगल यशगान ?
नष्ट जाहलें परि जिवाला स्मृतीच आमरण.
पायांचा बन्दा जिव माझा तुझ्या राम-भरता !
शिवशाहीच्या विभवा देवा ! ऊठ ऊठ आतां.
महनमंगला स्फूर्तिदायका माझ्या शाहीरा !
गुलामगिरिच्या वणव्यांतुनि घे दीनाचा मुजरा.

वन्दे मातरम्.

2325

REFBK-0002324

REFBK-0002324